# राज्य माहिती आयोग नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ११७९/२०२१/जळगाव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. आशिष अशोक सोनवणे मु.पो.शेंदुर्णी, ता.जामनेर, जि.जळगाव | अव्वल कारकुन, (नगरपालिका शाखा-४), जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव, ता.जि.जळगाव | जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव, ता.जि.जळगाव |

**सुनावणी दिनांक –१८/०१/२०२४**

१. **उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २३/०४/२०२१

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नियमबाह्य आदेश दिला आहे.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलली नाही.

३. **माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०/११/२०२०

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २०/११/२०२०

| | | |
|---|---|---|
| (३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी | : | सन २०१९ ते २०२० |
| (४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती | : | सन २०१९ ते २०२० या कालावधीत मुख्याधिकारी साजिद मुनाफ पिंजारी यांनी शेंदुर्णी नगर पंचायत समावेशन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव येथे पाठवलेल्या केलेल्या कार्यवाही संदर्भात जिल्हाधिकारी जळगाव कार्यालयातील न.प. शाखेतील लिपीक अजय कुलकर्णी यांनी केलेली कार्यालयीन टिपणी तपासु इश्चितो तसेच सदर न.पा.शाखेने केलेली टिपणी छायांकित प्रतीत स्वसाक्षाकित प्रमाणित करुन मिळावीत. |
| (५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : | दि.०७/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दि.१५/१२/२०२० रोजी अवलोकनास उपस्थित राहून आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यात यावी असे कळविण्यात आले होते. |

४. प्रथम अपील -

| | | |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | ०६/०१/२०२१ |
| (२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०६/०१/२०२१ |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. तसेच माहिती पाहणी करण्याचे पत्र मिळाले परंतु माहितीचे प्रतीचे शुल्क भरण्याचे पत्र मिळाले नाही. |
| (४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : | दि.०५/०२/२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीदरम्यान अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे अशी खात्री झाली असल्याने सदर अपिल निकाली काढण्यात आले होते. |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** — सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती देण्यात आलेली असल्याने करुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आले होते. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दि.१६/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, दि.०७/१२/२०२० रोजी रजिस्टर पोस्टाने उपलब्ध माहिती पाठविण्यात आलेली आहे.

६. **निष्कर्ष** —

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती पुरविलेली असुन वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिले आहे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे असे स्पष्ट होत आहे.

३. सदर माहिती अर्जाच्या व प्रथम अपिल अर्जाच्या कालावधीत कोव्हीड-१९ लॉकडाऊन चालू होते.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक. ११७९/२०२१/जळगाव निकाली काढण्यात येत आहे

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** औ-२८०८ 20 SEP 2024